# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

जा.क्र.मऔविम/भूविभाग/कार्या-१/ A55234 दिनांक : 9|3|2019

## परिपत्रक

**विषय : सूक्ष्म व लघु उद्योजकांसाठी MSME प्रवर्गातंर्गत प्राधान्याने भूखंडाचे वाटप करणेबाबत...**

केंद्र शासनाने व महाराष्ट्र राज्य शासनाने सूक्ष्म व लघु उद्योजकांसाठी महाराष्ट्र राज्यात प्रोत्साहन देण्याबाबत व त्यानुसार भूखंड राखीव ठेऊन प्राधान्याने तसेच सवलतीचे दराने भूखंडाचे वाटपाबाबत धोरण जाहिर केलेले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत औद्योगिक विकास साध्य करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे राज्यातील औद्योगिक वाढीसाठी सुयोग्य वातावरण निर्मिती करुन जागतिक स्तरावर स्पर्धात्मक स्थान प्राप्त करुन देण्यात महाराष्ट्र राज्य यशस्वी ठरलेले आहे. त्याचबरोबर, केंद्र शासनाने दि.१६.०१.२०१६ रोजी नवीन उद्योजकांना प्रोत्साहन मिळणेकरीता वेगवेगळया सवलती जाहिर करुन कृती आराखडा तयार केलेला आहे. मऔवि महामंडळाच्या विशेषतः अ आणि ब प्रभागाचा विकास फार मोठया प्रमाणावर झालेला असून सदर प्रभागात आर्थिक अडचणी/उद्योगातील स्पर्धा इत्यादीमुळे तरुण सुशिक्षित होतकरु युवकांना/ उद्योजकांना सुक्ष्म व लघु योजने अंतर्गत भूखंड अथवा गाळा घेणे शक्य होत नाही. त्यामुळे, सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहिक गटाकडून प्राधान्य सदराखाली भूखंड वाटप करण्याबाबत मागणी प्राप्त होत आहे. मात्र, महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार अ आणि ब प्रभागामधील औद्योगिक क्षेत्रामध्ये अशा प्रकारे २०० चौ.मी. चे भूखंड आरेखन करुन अशा सूक्ष्म व लघु उद्योजकांना स्वतंत्रपणे वाटप करणे शक्य होत नाही. त्यामुळे अशा सुक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहिक गटासाठी प्राधान्याने भूखंड वाटप करणेबाबत धोरण निश्चित होणे तसेच सुक्ष्म व लघु अंतर्गत रु. १ कोटी गुंतवणूकीतुन ३२ रोजगार निर्मिती होते तर ३२ कोटी रुपयांच्या एकल गुंतवणूकीद्वारे (Fixed Capital Investment) एकच रोजगार निर्माण होतो ही बाब विचारात घेऊन सूक्ष्म व लघु उद्योजकांना प्रोत्साहन देण्याकरीता प्राधान्याने भूखंड वाटप करण्याबाबत मा. संचालक मंडळाच्या दि. ११.०२.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन ठराव क्र. ५८७३ पारित करण्यात आला आहे. सदर ठरावाचे अनुषंगाने, सुक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहिक गटास भूखंड वाटप करण्याबाबत खालीलप्रमाणे धोरण निर्गमित करण्यात येत आहे-

१. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहिक गटाने भूखंड वाटपानंतर जिल्हा उद्योग केंद्राकडे नोंदणी करणे / कंपनी कायद्याखाली नोंदणी करणे आवश्यक राहिल.
२. किमान ५० सूक्ष्म व लघु उद्योजकांचा गट असणे आवश्यक आहे.
३. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या गटातील कमीत कमी ६० टक्के अस्तित्वातील/कार्यरत सभासदांचा उद्योग कार्यान्वीत असणे आवश्यक आहे.
४. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहिक गटाच्या प्रत्येक सभासदास २०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्र वाटप करता येणार नाही.
५. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहिक गटाची प्रकल्पामधील गुंतवणूक किमान रु. १०० कोटी असणे आवश्यक आहे.
६. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहिक गटाकरीता प्राधान्य सदराखाली जागा वाटप करण्याचे अधिकार मुख्यालयीन भू-वाटप समितीस (LAC) राहतील.

७. मुख्यालयीन भूखंड वाटप समितीने प्रस्ताव विचारात घेण्यापूर्वी सुक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहिक गटास (Cluster) तांत्रिक सल्लागार यांनी पडताळणी करुन सामूहिक गट (Cluster) म्हणून मान्यता देणे आवश्यक राहिल.

८. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहिक गट यांना भूखंड वाटप करते समयी सहा महिन्याच्या आत बांधकाम परवानगी घेणे बंधनकारक असल्याची अट वाटप पत्रात तसेच प्राथमिक करारनाम्यात नमूद करण्यात यावी.

९. प्राथमिक करारनाम्यामध्ये दोन वर्ष भूखंड विकास कालावधी बाबतची तरतूद नमूद करण्यात यावी.

१०. भूखंड वाटप करत असताना अ आणि ब औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपा दरम्यान Jt SPV स्थापन करणेच्या अटीवर तसेच प्राप्त अर्जदारांचे प्रकल्प अहवाल तपासून भूखंड वाटप करण्यात यावे.

११. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहिक गटांना प्राथमिक करारनामा किंवा ताबा दिनांकापासून (जे आधी असेल ते) पुढील १० वर्ष हस्तांतरण करता येणार नाही. तथापि, अपवादात्मक परिस्थितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मंजूरीने १०० टक्के फरकाची रक्कम वसुल करुन हस्तांतरण करणेबाबत निर्णय घेण्यात यावा.

१२. ज्या प्रयोजनासाठी भखंड वाटप करणेत आला आहे, त्याच प्रयोजनासाठी भूखंडाचा वापर करणे बंधनकारक राहिल.

१३. क, ड व ड+ वर्गामध्ये मोडणा-या औद्योगिक क्षेत्रामध्ये शासन मान्य Cluster/उद्योग समूह तथा तत्सम उद्योगाकरीता प्राधान्य देण्यात यावे.

१४. प्राधान्य क्रमाने वाटप करण्यात येणा-या भूखंडासाठी ज्या अटी व शर्ती लागू आहेत त्या अटी व शर्ती सदर भूखंड वाटपास लागू राहतील.

१५. सदरचे धोरण हे महामंडळाच्या अ आणि ब प्रभागाकरीता लागू राहिल.

१६. उपरोक्त प्रमाणे भूखंड वाटप करण्यात आल्यानंतर मुदतवाढ, हस्तांतरण, पोटभाडे, सबलीज, इत्यादीकरीता महामंडळाचे प्रचलित धोरण लागू राहिल.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अण्णासाहेब मिसाळ)**
सह मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम./सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
५. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
६. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
७. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
८. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२)/जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१०. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
११. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई